**ई-निविदा सादर करतांना सादर केलेल्या तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा माहितीची छाननी विविध अधिकाऱ्यांच्या निर्णयातील विसंगती दूर करणे व शासनाच्या सर्व अधिकारांचे निर्णय समन्यायी तत्वावर आधारीत असणे..**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.सीएटी-२०१९/प्र.क्र. १२०/इमारती-२**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९

**<u>संदर्भ</u> :** १) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र. ०८/इमा-२ दि. १२/०४/२०१७.
२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र. ०८/इमा-२ दि. २७/०९/२०१८.
३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक, क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि. २२/१०/२०१८.
४) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक, क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र. ०८/इमा-२ दि. २६/११/२०१८.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक, क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र. ०८/इमा-२ दि. २९/०१/२०१९.
६) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक, क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र. ०८/इमा-२ दि. ०७/०३/२०१९.

शासनाने निविदा प्रक्रियेत सुलभता साध्य करण्यासाठी व निविदा छाननी व मंजुरी पूर्वी आढळून आलेले गैरप्रकार व अनियमितता पूर्णपणे थांबविण्यासाठी खालील महत्वाचे निर्णय घेतले आहेत.

१) रु. ३ लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामांकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवणे.
२) निविदा छाननी करतांना किरकोळ कारणास्तव निविदा न उघडण्यास प्रतिबंध.
३) स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी निविदा प्रपत्रांमध्ये जाचक अटी नमूद न करणे.
४) कंत्राटदाराचे पंजीकरणामुळे (रजिस्ट्रेशन) विशिष्ट कामांसाठी स्पर्धा न होणे टाळण्यासाठी रु. १.५० कोटी पेक्षा जास्त क्षमतेबाबत रजिस्ट्रेशन प्रक्रिया रद्द करणे.
५) देशातील कोणत्याही कंत्राटदारांकडे आर्थिक व तांत्रिक क्षमता असेल त्यास निविदा भरता येईल अशी तरतूद करणे.
६) निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यातील माहितीचे निराकरण कंत्राटदारास पूर्ण संधी देऊन जास्तीची माहिती मागवून व त्यात कंत्राटदार पात्र ठरत असल्यास ही माहिती अभिलेखावर ठेवून आर्थिक निविदा लिफाफा उघडणे व स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यास वाव निर्माण करणे.
७) निविदेची सर्वदूर व जास्तीत जास्त प्रसिध्दी करणे.

असे असूनही निविदा छाननीमध्ये अनियमितता असणे व पारदर्शीपणा नसणे या स्वरूपाच्या तक्रारी वारंवार प्राप्त होत आहेत व काही प्रकरणात शासन मान्यतेने दोषारोप निश्चित करून शिस्तभंगाची कारवाई करावी लागली आहे. काही प्रकरणात न्यायालयीन निर्णय शासनाच्या विरुध्द लागले आहेत तसेच काही प्रकरणी नव्याने निविदा मागवून कालापव्यय होत आहे. या सर्व बाबींचा व प्राप्त सर्व प्रकरणांचा सखोल अभ्यास करून शासन पुनश्च एकदा सर्व कार्यकारी / अधीक्षक / मुख्य अभियंत्यांसाठी खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे. आदेशांचे पालन न झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद सर्व संबंधीतांनी घ्यावी.

१) तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अथवा जोडलेल्या विवरणामध्ये काही शंका असल्यास संबंधीत कंत्राटराकडून त्यांचे स्पष्टीकरण घ्यावे, अश्या प्रकरणी पूरक विवरणे / प्रमाणपत्रे तसेच जास्तीची माहिती प्राप्त करून ती अभिलेखावर ठेवावी व तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अपुरी आहे या कारणास्तव कंत्राटदारास अपात्र ठरवू नये. तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अपूर्ण असल्यास ती वरील प्रमाणे विशिष्ट कालावधीत (८ / १५ दिवस ) उपलब्ध करून देण्याची संधी देण्यात यावी व याकरीता कंत्राटदार असमर्थ ठरल्यास नंतर त्यास अपात्र ठरवावे व तसे त्यास लेखी कळवून नंतर अन्य निविदा उघडण्याची कार्यवाही करावी. निविदेच्या तांत्रिक लिफाफ्यातील माहितीची छाननी करतांना निविदेच्या गाभ्यातील महत्वाच्या अटींचे पालन होत आहे हे पहावे. स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी छाननीची मध्यवर्ती कल्पना स्पर्धात्मक दर मिळविणे (True spirit of competition to get competitive rates) हे असावे.

२) **तांत्रिक लिफाफ्याच्या पडताळणी अंती पात्र कंत्राटदाराने "माझा आर्थिक देकार उघडण्यात येवू नये" अथवा "मी स्पर्धेतून माघार घेत आहे" असे कळविल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येवून त्याचा आर्थिक देकार उघडण्यात यावा.**

३) कंत्राटदार एकमेकां विरुध्द तक्रार करत असतील अथवा हरकती ( Objections ) घेत असतील तर रु. १५ कोटी किंमतीपर्यंतच्या कामांसाठी मुख्य अभियंता व रु. १५ कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी निविदा स्विकृतीस सक्षम अधिकारी यांचेकडे आवश्यक कागदपत्रासह संदर्भ करुन निर्णय घ्यावा. निविदा स्विकृती प्राधिकाऱ्यांचा निर्णय दोन्ही बाजूस अंतिम व बंधनकारक राहील अशी अट निविदेत समाविष्ट करण्यात यावी.

४) जे निविदा प्रपत्र Portal वर upload केले आहे व विहीत प्रक्रियेनंतर निविदा प्रपत्र विचलनाची ( Common set of deviations ) सक्षम प्राधिकाऱ्याने ( रु. १५ कोटी किंमतीपर्यंत मुख्य अभियंता, रु. १५ कोटी पेक्षा जास्त किंमतीकरीता शासन स्तरावरील सक्षम प्राधिकारी ) मान्य केलेल्या व upload केलेल्या CSD व निविदा अटी व शर्ती प्रमाणेच छाननी करावी. कोणत्याही परिस्थितीत अटी व शर्ती, CSD Upload केल्यानंतर समाविष्ट करु नये. एखादी महत्वाची अट / शर्त Uploaded निविदा प्रपत्रात नजरचुकीने अथवा अनावधानाने समाविष्ट करावयाची राहिल्यास, निविदा पूर्व बैठकी आधी अथवा निविदा पूर्व बैठकीचे वेळी " Correction Addendum", जास्तीचे सुधारणा प्रपत्र म्हणून निविदा प्रपत्र विचलन ( Common set of Deviation ) मध्ये सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने तात्काळ समाविष्ट करावे. Correction Addendum अथवा CSD मध्ये आवश्यक अट समाविष्ट करणे शक्य झाले नाही तर त्या अटी शिवाय निविदा प्रक्रिया पूर्ण करावी. कोणत्याही परिस्थितीत निविदा प्रक्रिया रद्द करु नये.

५) आर्थिक देकार उघडल्यानंतर, निविदा प्रक्रियेत निविदा प्राप्त कंत्राटदाराने अथवा अन्य कंत्राटदारांनी खोटी / बनावट कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यास जोडून निविदा मिळवण्याचे / निविदा प्रक्रियेत भाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ ह्या कंत्राटदारास / कंत्राटदार भागीदारीस अथवा कंपनीस / संयुक्त कंपनी (JV / LLP / Pvt Ltd / Public Limited Company) असल्यास संबंधीत कंपनीस १५ दिवसांनी नोटीस देऊन काळ्या यादीत टाकण्याच्या परिपत्रकाचे प्रारुप शासनास सादर करावे व मंजूर करून घेऊन त्यास web site वर वृत्तपत्रीय प्रसिध्दी देऊन, प्रथम ३ वर्षाचे कालावधीकरीता, महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या काळ्या यादीत समाविष्ट करावे व **परिपत्रक निर्गमनाच्या दिनांकापासून ३ वर्षे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध राहील, ही अट कंपनीचा मालक / संचालक / भागीदार यांना संयुक्त व स्वतंत्रपणे ( Combined & several independent liability ) लागू राहील. या स्वरूपाची अट निविदा प्रपत्रात समाविष्ट करावी.**

६) अनेक वेळा कंत्राटदार निविदा प्रक्रियेत पात्र होण्यासाठी शासनाचे इतर विभाग / केन्द्र शासनाचे विभाग / नगर पालिका / नगर परिषदा / सनदी लेखापाल / खाजगी वास्तुशास्त्रज्ञ / प्राचार्य / सार्वजनिक उपक्रम इ. अनेक संस्थांकडून प्रमाणपत्रे ( work done or experience certificate ) प्राप्त करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. अश्या वेळेस प्राप्त प्रमाणपत्रातील माहितीची खातरजमा ( Verification ) व सत्यता प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यावरील अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून घ्यावी. (उदा. MSRDC च्या EE / SE नी contracts दिले असल्यास व त्याविषयी शंका असल्यास CE- MSRDC अथवा JMD- MSRDC यांचे कडून खात्री करून चुकीचे / दिशाभूल करणारे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यास व त्याची पडताळणी न केल्यास संबंधीत कंत्राटदारावर दंडनीय कारवाई न केल्यास संबंधित निविदा उघडणाऱ्या कार्यकारी अभियंता / अधीक्षक अभियंता यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७) एकच कंत्राटदार, एकाच विभागातील, एकाच निविदा नोटीस मधील अनेक कामे निम्नतर देकार भरून कामे मिळवत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेता रु. ३ लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदा मध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करावी. **त्यासंदर्भात अट परिशिष्ट १ मध्ये दिल्याप्रमाणे [(अे x एन x २)- बी] ऐवजी [(अे x एन x १.५ )- बी] समाविष्ट करावी.** शासन निर्णय दिनांक २७/०९/२०१८ मधील परिच्छेद २.९ ड मध्ये सुधारणा करण्यात आली आहे असे वाचावे.

८) ऑन लाईन निविदा सादर झाल्यानंतर ७२ तासाच्या आत त्याच निविदेची Hard Copy व Bid Security मूळ प्रतीत सादर करणे अनिवार्य करावे, तथापि आता ह्या बाबतीत मूळ प्रत Hard Copy सादर केली / दिली नाही तरी कंत्राटदारांच्या कमी दराची निविदा भरुन स्पर्धा टाळण्याची Hard Copy सादर न करण्याची प्रवृत्ती लक्षात घेता सर्व प्राप्त निविदा उघडण्यात याव्यात.

९) निविदा उघडणे प्रक्रियेबाबत कंत्राटदारांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास अश्या रु. १५ कोटी किंमती पर्यंतच्या कामासाठी मुख्य अभियंता तपासणी करतील व त्यांचे निर्णय अंतिम राहील. रु. १५ कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या कामांसाठी संबंधित उपसचिव निविदा तक्रारीची छाननी करतील व अ. मु. स. (सा. बां. वि.) यांचेकडे अहवाल सादर करतील. अश्या प्रकरणाबाबत अ.मु.स. (सा. बां. वि. ) यांचा निर्णय अंतिम राहील.

१०) निविदा उघडणे प्रक्रियेत शासन स्तरावर / मुख्य अभियंता स्तरावर सर्वसाधारण व्यक्ती / लोक प्रतिनिधी यांची तक्रार प्राप्त झाल्यास त्याचे गांभिर्य लक्षात घेऊन मुख्य अभियंता यांनी छाननी करुन अ. मु. स. (सा. बां.) यांना अहवाल सादर करावा. प्रत्येक प्रकरणी अ. मु. स. (सा. बां. वि.) यांचा निर्णय अंतिम राहील व त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यात यावी.

११) निविदा उघडणे प्रक्रियेबाबत वृत्तपत्रे / समाजमाध्यमे / दृकश्राव्यत माध्यमे / टी.व्ही. यावर वृत्त प्रसिध्द झाल्यास संबंधीत वृत्ताची संबंधीत अधीक्षक अभियंता यांनी तात्काळ दखल घ्यावी व १२ तासाचे आत अ.मु.स. (सा. बां.) यांना थेट सत्यासत्यता अहवाल सादर करावा व वृत्तपत्रे / माध्यमे यातील तक्रार खोटी व विपर्यस्त असल्यास ह्याचा तात्काळ खुलासा करावा.

१२) शासन लवकरच सर्व निविदा प्रपत्रांचा ( B-1 / B-2 / SBD / C / EPC / HAM ) Standard Format स्वतंत्र शासन परिपत्रकांद्वारे प्रसिध्द करीत आहे त्याच अटी व शर्ती समाविष्ट कराव्यात. त्यापेक्षा कोणतीही वेगळी अट विभाग / मंडळ / प्रादेशिक स्तरावर समाविष्ट करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३) शासनस्तरावर सादर निविदा माहितीमध्ये अचूकता असावी व विहीत प्रपत्रावर छाननी करून नंतरच मुख्य अभियंता यांनी स्वत: स्वाक्षरी करावी. सर्व चेकलिस्टवर मुख्य अभियंता यांनी प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन नंतरच शासनास प्रस्ताव सादर करावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०९१७१८०३४००९१८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrashekhar Prabhakar Joshi

Digitally signed by Chandrashekhar Prabhakar Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c8893d1513ab2ea4a7f8c612a31ac748bd05ab00efd5e22f2d25c9872e36d29, serialNumber=423be4ff70a89bfc945ec5e481b972d568094459d7ff8219a1f968860a431f89, cn=Chandrashekhar Prabhakar Joshi
Date: 2019.09.17 18:16:18 +05'30'

**( चंद्रशेखर जोशी )**
**सचिव ( रस्ते ), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
२) मा. मंत्री (सा. बां. ) यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (सा. बां.) यांचे खाजगी सचिव.
४) सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (विद्युतसह)
५) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
६) संचालक, उद्याने व उपवने, मुंबई
७) सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य / विद्युत/यांत्रिकी)
८) सर्व कार्यकारी अभियंते / सर्व उपअभियंते
९) कार्यासन इमारती-२ (निवडनस्ती)